N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** कवठेमहांकाळ
**Year (वर्ष):** 2024
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0057
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/02/2024 18:57

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Date From (दिनांक पासून):** 09/02/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/02/2024
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Time From (वेळेपासून):** 12:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/02/2024 **Time (वेळ):** 18:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 034
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/02/2024 18:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 8 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालयात, हरोली ,कवठेमहांकाळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.दत्तात्रय तानाजी जगताप

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of-Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.ड़ी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बनेवाडी,कवठेमहांकाळ,कवठेमहांकाळ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बनेवाडी,कवठेमहांकाळ,कवठेमहांकाळ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7350931635

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती प्रतीभा गणपती लोंढे | | | 1. कुपवाड ,मिरज,सांगली,महाराष्ट्र, भारत |
| 2 | श्री. युवराज ऊर्फ प्रविण रामचंद्र मोरे | | | 1. बनेवाडी;कवठेमहांकाळ, कवठेमहांकाळ,सांगली,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | (तीन हजार पाचशे रुपये) | 3,500.00 |



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,500.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत):**

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास आहे. बनेवाडी गांवेचे हद्दीत आमचे आजोबांची गट नंबर 542 क्षेत्र 1.14 हे. आर शेतजमीन आहे. सदर शेतजमीनीचे दुय्यम निबंधक कवठेमहांकाळ यांचे समक्ष सरसनिरस मानाने दस्त क्र. 131/5-33/2024 दि.12.01.2024 रोजी वाटणी पत्र केलेले आहे. सदर जमीनीचे गटाचे वाटणी पत्राची माझे वडील तानाजी भाऊ जगताप व माझी चुलती राजाक्का पांडुरंग जगताप यांचे नांवे नोंद होणे करीता अर्ज व दस्त्याची प्रत दि.17.01.2024 रोजी तलाठी कार्यालय हारोली येथे दिला होता. सदर अर्जावर तलाठी यांचेकडून काय कार्यवाही झाली हे पाहण्यासाठी मी दि.07.02.2024 रोजी तलाठी कार्यालय हारोली येथे जाऊन तलाठी लोंढे मॅडम व कोतवाल प्रवीण मोरे यांची भेट घेऊन त्यांचेशी आमचे वाटणी पत्रकाप्रमाणे 7/12 सदरी नोंदीचे कामाची विचारपुस केली त्यावेळी तलाठी लोंढे मॅडम व कोतवाल प्रवीण मोरे यांनी वाटणी पत्रकाची नोंद करुन देतो त्यासाठी 3500/- रुपये द्यावे लागतील असे सांगितले. मला तलाठी लोंढे मॅडम व कोतवाल प्रवीण मोरे यांना मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.08.02.2024 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री. संदीप पाटील, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांना संपर्क करून माझी तलाठी लोंढे मॅडम व कोतवाल प्रवीण मोरे यांचेविरूध्द लाच मागणीबाबतची तक्रार कळविली. त्यावेळी पाटील साहेब यांनी पोलीस निरीक्षक श्री दत्तात्रय पुजारी हे कारवाई करतील असे सांगुन मला पोलीस निरीक्षक श्री पुजारी साहेबांचा मोबाईल नंबर दिला. त्यानंतर पुजारी साहेबांनी मला संपर्क करुन दुपारी 3.00 वाजण्याचे सुमारास खरशिंग फाटा येथे येत असल्याचे सांगून सदर ठिकाणी हजर राहण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी माझेकडील यामाहा मोटार सायकल एम एच-10 बी.एन 5640 वरुन खरशिंग फाटा येथे जावून पुजारी साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी पुजारी साहेब यांनी मला त्यांचेकडील शासकीय वाहनामध्ये बसण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी त्यांचेकडील वाहनामध्ये बसलो. त्यावेळी पुजारी साहेब यांनी सोबत असले सापळा पथकाची व दोन सरकारी पंचांची ओळख करून दिली. त्यानंतर मी पुजारी साहेब व पंचांना माझी तलाठी लोंढे मॅडम व कोतवाल प्रवीण मोरे यांचेविरुध्द लाच मागणी बाबतची तक्रार समक्ष सांगितली असता पुजारी साहेब यांनी मला लेखी तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी त्यांना माझा लेखी तक्रारी अर्ज दिला. माझे तक्रारी अर्जावर पोलीस निरीक्षक पुजारी साहेब व दोन्ही पंचानी वाचून सह्या केल्या.त्यानंतर तलाठी लोंढे मॅडम व कोतवाल प्रवीण मोरे यांचेविरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने पुजारी साहेब यांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली व सदर कारवाईसाठी पंच नं. 1 म्हणून श्री. मुकेश मधुकर कोळी यांनी व पंच नं.2 म्हणून श्री. चंद्रकांत जगन्नाथ निकम यांनी काम करण्याचे निश्चित केले.त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच. नं.1 कोळी असे माझेकडील यामाहा मोटार सायकल एम.एच.10 बी.एन. 5640 वरुन रवाना होवून तलाठी कार्यालय होरोली येथे दाखल झालो. तलाठी कार्यालय हारोली येथे तलाठी लोंढे मॅडम व कोतवाल प्रवीण मोरे हजर होते. मी तलाठी लोंढे मॅडम यांना नमस्कार केला. तलाठी मॅडम व कोतवाल प्रवीण मोरे यांची भेट घेतली. त्यावेळी मी तलाठी मॅडम व कोतवाल प्रवीण मोरे यांचेशी आमचे वाटणीपत्राचे नोंदीचे कामा संदर्भात चर्चा केली. त्यावेळी तलाठी लोंढे मॅडम यांनी "तुमचं काय द्यायच ते द्या, तुम्हाला काढुन देतो..घेऊन या" असे सांगीतले. त्यावर मी त्यांना "साडेतीन हजार रुपये" सांगीतले असल्याबाबत सांगीतले. त्यावर तलाठी लोंढे मॅडम यांनी "असुदे घेऊन या" असे मला सांगीतले. त्यावर मी त्यांना सही करीता नोटीस आज देताय का असे विचारले, त्यावर तलाठी मॅडम यांनी "पैसे तुम्ही आज जर देऊन गेला असता तर उद्या काढून ठेवतो, त्यावर कोतवाल मोरे यांनी तलाठी लोंढे मॅडम यांना उद्देशुन "ह्याचं काय झालयं माहिती हाय का..वाटणी पत्र दोघात केलय...दाजी निम्मे पैसे देतोय व मी निम्मे पैसे देतोय असे सांगीतले. त्यावर लोंढे मॅडम यांनी मला "तुम्ही पैसे द्यायला मागं पुढं करायला लागलाय" असे सांगीतले. त्यावर मी त्यांना "उद्या तुम्हाला पैसे पोहच करतो" असे सांगीतले. त्यावर तलाठी लोंढे मॅडम यांनी येऊन जावा उद्या आज आमच काम हाय असे म्हणुन उद्या सकाळी 11.30 वाजण्याचे सुमारास येण्यास सांगीतलेने मी व



Scanned with OKEN Scanner

पंच कोळी असे माझेकडील मोटार सायकलने सजा हारोली येथून रवाना होवून पुजारी साहेब व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. पुजारी साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर पुजारी साहेबांनी मला व पंच कोळी यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.मी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने पुजारी साहेबांनी तलाठी तलाठी लोंढे मॅडम व कोतवाल प्रवीण मोरे यांचेकडे केले पडताळणी कारवाईमध्ये, तलाठी लोंढे मॅडम यांनी माझ्याकडे 3500/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम उद्या सकाळी 11.30 वाजता घेऊन येण्यास सांगीतले व कोतवाल प्रवीण मोरे यांनी मी तलाठी लोंढे मॅडम यांना 3500/- देण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाल्याने पुजारी साहेबांनी दि. 09.02.2024 रोजी सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करुन संपर्क केल्यानंतर लाच रक्कम घेवून हजर राहण्याचे सुचना दिल्या.आज दि. 09.02.2024 रोजी पुजारी साहेबांनी मला 10.00 वा.चे सुमारास संपर्क करून शेंडे मळ्याकडे जाणारे कॅनॉल जवळ हजर राहणेच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे मी माझेकडील मोटार सायकलवरुन पुजारी साहेब यांचे समक्ष हजर झालो. त्यानंतर पुजारी साहेब यांनी तलाठी लोंढे मॅडम व कोतवाल प्रवीण मोरे यांचेविरूध्द तलाठी कार्यालय हारोली येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला लाच म्हणुन द्यावी लागणारी रक्कम हजर करणेबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी माझेकडील शिल्लकीतील 3500/- रुपये पुजारी साहेब यांचे समक्ष हजर केले. त्यानंतर श्री. पुजारी साहेब यांनी लाच रक्कमेचे नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर दोन्ही पंच, श्री. पुजारी साहेब व मी सही केली. श्री.पुजारी साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती दिली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा माझे पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यामध्ये ठेवल्या व पुजारी साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला, त्यानंतर मी व पंच कोळी असे माझेकडील यामाहा मोटार सायकलवरुन रवाना होवून तलाठी कार्यालय हारोली येथे दाखल झालो. माझे पाठोपाठ पुजारी साहेब व सापळा पथक त्यांचेकडील वाहनाने तलाठी कार्यालय हारोली आवारात दाखल झाले. मी व पंच कोळी असे दोघे पायी चालत तलाठी कार्यालयात गेलो. पुजारी साहेब व सापळा पथक असे आमचे पाठोपाठ येऊन तलाठी कार्यालयाचे आजु बाजुस सापळा लावून थांबलेले दिसले. मी व पंच कोळी असे तलाठी लोंढे मॅडम यांचे टेबल समोर गेलो. तलाठी लोंढे मॅडम यांचे डावे हातास कोतवाल प्रवीण मोरे हे बसलेले होते. मी कोतवाल मोरे यांना "झाले काय आपल" असे विचारले, त्यावर कोतवाल मोरे यांनी "आत्ता आलय, हितनं, हितनं चालु झालय" असे सांगीतले. त्यावर मी तलाठी लोंढे मॅडम यांना "मला जायच आहे पुढं" असे सांगीतले, त्यावर तलाठी लोंढे मॅडम यांनी मला आतील खोलीमध्ये घेऊन जाणे बाबत कोतवाल प्रवीण मोरे यांना इशारा केला. त्याप्रमाणे कोतवाल प्रवीण मोरे यांनी मला "ये आत ये" असे सांगीतले. त्याप्रमाणे मी कोतवाल मोरे यांचे पाठोपाठ आतील खोलीमध्ये गेलो. मी कोतवाल मोरे यांना "मॅडमचे आणले होते" असे सांगीतले. त्यावर कोतवाल मोरे यांनी "सुधाकर, राजाक्का, श्रेया, सरिता आणि सुप्रिया, तानाजी" अशी नोटीस वरील नांवे वाचून नोटीस माझ्याकडे दिली. आणि त्यांच्या सह्या आणण्यास सांगीतल्या. त्यावर मी त्यांना "बाकीच्या सह्या लागता काय" असे विचारले त्यावर कोतवाल मोरे यांनी "बाकी कोण" असे विचारले त्यावर मी त्यांना "अल्पवयीन नविनमध्ये हायत ते" असे सांगीतले. त्यावर कोतवाल मोरे यांनी " नांव हाय काय भूषण, सरिता, राजाक्का, श्रेया आठराच्या आत लहान मुलं हायत.ना, आठरा वर्षाच्या आतली नांव सह्या करुन आणायला पाहिजे होत. आठरा वर्षाच्या पुढच्या सह्या हायत" असे सांगीतले. त्यावेळी कोतवाल प्रवीण मोरे यांनी मला हाताने इशारा करुन लाचेची मागणी केल्याने मी त्यांना माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशातील 3500/- रुपये अँथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम माझे उजवे हाताने बाहेर काढून कोतवाल प्रवीण मोरे यांचेसमोर धरली. कोतवाला मोरे यांनी मला "किती हायतं" असे विचारले त्यावर मी त्यांना "साडेतीन हायंत हि घे" असे सांगीतले. त्यावर कोतवाल मोरे यांनी लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारुन त्यांचे पॅन्टचे उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली आणि संध्याकाळी "पाचशे दे मला" असे सांगीतले. त्यावर मी त्याला नोटीस दाखवुन "घेऊन उद्या येतो बघ" असे सांगुन खोलीतुन बाहेर आलो. तलाठी लोंढे मॅडम यांनी माझ्याकडे बघुन हाताने इशारा करुन "काम झाल्याशिवाय तारखा भरणार न्हाय बरं का?" असे सांगीतले. त्यावर मी तलाठी लोंढे मॅडम यांना "दिलय" असे सांगीतले. त्यावर तलाठी लोंढे मॅडम "अं" असे म्हणालेने मी तलाठी कार्यालयाचे बाहेर येवून माझेकडील हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारले बाबत पुर्व नियोजीत इशारा केला. लागलीच सापळा पथक माझेजवळ आले व पुजारी साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेवून मला बाजूला जावून थांबण्यास सांगितले. सापळा पथकाने तलाठी लोंढे मॅडम व कोतवाल प्रवीण मोरे यांना ताब्यात घेतले. सदर ठिकाणी पुजारी साहेबांनी तलाठी लोंढे मॅडम व कोतवाल प्रवीण मोरे यांना त्यांचे



Scanned with OKEN Scanner

नाव, गांव, वर्ग विचारले असतां त्यांनी त्यांचे नाव 1) श्रीमती प्रतीभा गणपती लोंढे वय – 47 वर्षे, तलाठी हारोली बनेवाडी वर्ग – 3 रा. जी-3, अकुज ड्रिमलँड जवळ कुपवाड, ता. मिरज, जि.सांगली मो.नं. 75075847 व 2) युवराज ऊर्फ प्रवीण रामचंद्र मोरे, वय 38 वर्षे, व्यवसाय कोतवाल, सजा हारोली, रा: बनेवाडी, ता.कवठेमहांकाळ, जि. सांगली मो.नं. 9673622349 असे सांगीतले.सदर ठिकाणी सापळा कारवाई मधील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर सापळापूर्व, सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्रामगृह कवठेमहांकाळ येथे पूर्ण करण्यात आली. तरी दि. 08.02.2024 रोजी 16.24 वा. ते 17.05 वा. च्या दरम्यान लोकसेवक श्रीमती प्रतीभा गणपती लोंढे वय – 47 वर्षे, तलाठी हारोली बनेवाडी वर्ग – 3 रा. जी-3, अकुज ड्रिमलँड जवळ कुपवाड, ता. मिरज, जि.सांगली यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने आमचे वाटणी पत्राचे 7/12 उता-यावर नोंद धरण्याकरीता व सबंधीतांच्या सह्या आणण्यासाठी नोटीस देणेकरीता माझ्याकडे 3500/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम दि.09.02.2024 रोजी सकाळी 11.30 वाजता घेऊन येण्यास सांगीतले व कोतवाल युवराज ऊर्फ प्रवीण मोरे यांनी 3500/- रुपये लाच रक्कम तलाठी श्रीमती प्रतीभा लोंढे यांना देण्यास प्रोत्साहन दिले. व आज दि.09.02.2024 रोजीचे 12.18 वा ते 12.35 चे दरम्यान तलाठी प्रतीभा लोंढे व कोतवाल युवराज ऊर्फ प्रवीण मोरे यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन कोतवाल युवराज ऊर्फ प्रवीण मोरे याने माझ्याकडून तलाठी कार्यालय हारोलीचे आतील खोलीमध्ये 3500रुपये लाचेची मागणी करुन तलाठी लोंढे मॅडम यांचे सांगणे वरुन माझ्याकडून लाच रक्कम3500

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANDEEP RANGRAO KOLEKAR(I (Inspector)) / PNMH53637 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

D. T. J...

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठाणे अंमलदार
कळवेमहांकाळ पोलिस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SANDEEP RANGRAC
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PNMH53637



Scanned with OKEN Scanner